**महसूल विभागामार्फत राज्यात दिनांक १ ऑगस्ट, २०२६ रोजी <u>“महसूल दिन” साजरा करणेबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल विभाग**

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र. ११५/आस्था-०१

मुख्य इमारत, पहिला मजला,

मंत्रालय मुंबई-४०० ०३२

दिनांक- ३१ जुलै, २०२६.

**संदर्भ-**

१) शासन परिपत्रक,महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण -१०/००/प्र.क्र.३०६/म-५, दिनांक १९.०७.२००२

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण-०२/२०१०/प्र.क्र.१२/ई-१, दिनांक ३.०९.२०१०

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण-०२/२०१०/प्र.क्र.१२/ई-१, दिनांक ६.०९.२०११

**<u>प्रस्तावना :-</u>**

संदर्भ क्र. १ अन्वये, महसूल विभागाने जिल्हास्तरीय महसूली कामे वेळच्यावेळी पूर्ण करुन त्यानुसार अभिलेख अद्यावत करणे, वसुलीच्या नोटीसेस पाठविणे, मोजणी करणे, अपिल प्रकरणांची चौकशी करणे इ. कामे वेळच्यावेळी व वेळापत्रकानुसार करणा-या अधिकारी/ कर्मचा-यांचा आणि महसुली वसुलीचे उद्दिष्ट पार करणा-या अधिकारी/कर्मचा-यांचा सत्कार करण्याकरीता आणि महसूल विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्याकरीता दरवर्षी दिनांक १ ऑगस्ट हा “**महसूल दिन”** म्हणून राज्यभर साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच, महसूल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उत्कृष्ट काम करणा-या व नवनवीन संकल्पना राबविणा-या जिल्हाधिका-यांचा दरवर्षी राज्यस्तरावर “उत्कृष्ट जिल्हाधिकारी” म्हणून प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव-सन्मान करण्याचा निर्णय संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तद्नंतर, याच धर्तीवर विभागनिहाय उत्कृष्ट काम करणा-या अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, सहायक महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, महसूल सहायक, ग्राम महसूल अधिकारी, पोलीस पाटील, कोतवाल व

वाहनचालक यांचा उत्कृष्ट अधिकारी/कर्मचारी म्हणून गौरव-सन्मान करण्याचा निर्णय संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

महसूल विभागाकडून देण्यात येणा-या सेवा आणि विभागाद्वारे राबविण्यात येणा-या विविध योजना याबाबत राज्यातील नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा. तसेच, त्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धींगत व्हावा, यासाठी विशेष मोहिम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने यावर्षी, १ ऑगस्ट, २०२६ रोजी **“महसूल दिन”** साजरा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

__शासन निर्णय:-__

१. महसूल विभागाने जिल्हा स्तरीय महसुली कामे वेळच्यावेळी पूर्ण करुन त्यानुसार अभिलेख अद्यावत करणे, वसुलीच्या नोटीसेस पाठविणे, मोजणी करणे, अपिल प्रकरणांची चौकशी करणे इ. कामे वेळच्यावेळी व वेळापत्रकानुसार करणा-या अधिकारी/कर्मचा-यांचा आणि महसूली वसुलीचे उदिष्ट पार करणा-या अधिकारी/कर्मचा-यांचा सत्कार करण्याकरीता आणि महसूल विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्याकरीता संदर्भ क्र. १, २ व ३ नुसार, **दरवर्षीप्रमाणे दिनांक १ ऑगस्ट, २०२६ हा “महसूल दिन” म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा**.

२. संदर्भ क्र. १, २ व ३ मधील तरतुदीनुसार व जिल्हयात राबविण्यात आलेल्या “महाराजस्व अभियान” अंतर्गत केलेल्या कामाची दखल घेऊन, विभागनिहाय उत्कृष्ट काम करणा-या अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, सहायक महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, महसूल सहायक, ग्राम महसूल अधिकारी, पोलीस पाटील, कोतवाल व वाहनचालक यांचा उत्कृष्ट अधिकारी/कर्मचारी म्हणून गौरव-सन्मान करण्यात यावा.

३. महसूल दिनाच्या आयोजनाचा खर्च त्या-त्या कार्यालयाच्या कार्यालयीन खर्चासाठी असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. या कार्यक्रमांच्या आयोजनावेळी अनावश्यक खर्च टाळण्यात यावा. तसेच, कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्तांचे मार्गदर्शन घ्यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७३११६४२५८०८४८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.07.31 16:49:29 +05'30'

**(महेश वरुडकर)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ. शु., क्रीडा व अल्पसंख्यांक विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व अपर आयुक्त (महसूल/सामान्य), विभागीय आयुक्त कार्यालय
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व अपर जिल्हाधिकारी/ निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी
१५. सर्व निवासी उपजिल्हाधिकारी
१६. सर्व उपविभागीय अधिकारी /तहसिलदार/नायब तहसिलदार
१७. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
१८. सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. निवडनस्ती (आस्था-०१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.,